प्रेसनोट दिनांक ३०/१२/२०१९

| | |
|---|---|
| अेसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक नाव व पत्ता | श्री. विनायक नारायण जाधव, वय. ३८ वर्षे, ग्रामसेवक ग्रामपंचायत चवे रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी, सध्या रा. रुम नं.१, दत्तकृपा निवास, जाकादेवी, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी, मुळ रा. अजिंक्यनगर, खानापुर, ता. भुदरगड, जि. कोल्हापुर |
| घटनेचे ठिकाण | लोकसेवक यांचे रहाते घरी रुम नं.१, दत्तकृपा निवास, जाकादेवी, रत्नागिरी ता. जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये. |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार ग्रामपंचायत चवे येथे ग्रामरोजगार सेवक म्हणुन कामाला आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना पंचायत समिती रत्नागिरी अंतर्गत ग्रामपंचायती मार्फत घरकुल योजना, शौचालय खडडे, फळबाग लागवड, सिंचन विहीर इत्यादी योजनांबाबत गावातील लाभार्थ्यांना माहीती देणे, कागदपत्र जमा करुन घेणे व संबधीत योजनेचे मस्टरवर सहया घेणे इत्यादी कामांची पुर्तता करुन ग्रामपंचायतीमध्ये लोकसेवक विनायक जाधव, ग्रामसेवक यांचेकडे जमा करतात. सदर कामाचे त्यांना दोन ते अडीच टक्के मानधन मिळते. त्याप्रमाणे तक्रारदार यांचे दि. १९/०३/१९ ते दि. ३१/०३/१९ व दि. ०१/०४/१९ ते दि. ०४/०७/१९ या कालावधीमध्ये वरीलप्रमाणे केलेल्या कामाचे मानधन एकुण ८,९११/- रुपये पंचायत समिती रत्नागिरी मार्फत चवे ग्रामपंचायतीचे नावे त्यांच्या खात्यात जमा झाले. सदर रक्कमेचा चेक देणेसाठी लोकसेवक विनायक जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रुपये लाचेची मागणी केली व सदरची रक्कम दिल्याशिवाय ते चेक देणार नाहीत. अशा आशयाचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि. १६/१२/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी कार्यालयाकडे दिला होता.<br>त्यासंबधाने करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये तक्रारदार यांनी लोकसेवक विनायक जाधव यांची दिनांक २५/१२/२०१९ रोजी जाकादेवी येथे त्यांच्या घरी भेट घेतली असता, लोकसेवक जाधव यांनी मानधनाची रक्कम ८,९११/- रुपये आरटीजीएस करतो किंवा चेक देतो असे सांगुन तक्रारदार यांचेकडे ५,०००/-रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दि. ३०/१२/२०१९ रोजी सापळा आयोजित करण्यात आला. सदर सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन ५,०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यानंतर विनायक जाधव, ग्रामसेवक चवे यांना त्यांचे जाकादेवी येथील राहते घरी येथे १६.४८ वाजता रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893
Office email :-dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :-www.acbmaharastra.gov.in
Mobile App :-www.acbmaharastra.net
Facebook Page:-www.facebook.com/MaharastraACB

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau RATNAGIRI

(निसर्ग ओतारी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी